नि.दि.दावा क्र.५३/२०१३.
शिवाजी ए. वि. विश्वनाथ त्रिं.

## : निशाणी १९ कडील आदेश :

प्रस्तुत अर्ज, वादींनी, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती होऊन मिळण्याकरीता केलेला आहे.

२. अर्जातील कथने थोडक्यात अशी आहेत की, प्रस्तुत दावा मोजणी होऊन मिळण्याकरिता केलेला आहे. दाव्यामध्ये अदयाप मुद्दे निघालेले नाहीत. प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी, सर्व्हे क्र.१८० मधील पोट हिस्स्यामध्ये वादी व प्रतिवादींची वहिवाट असतानाही प्रतिवादी वादीस हरकत अडथळा करत आहेत, असे कथन केलेले आहे. दावा दाखल केल्यानंतरही प्रतिवादी वादीचे सर्व्हे क्र.१८०/२ब/१ क्षेत्र २ हे ५ आर व सर्व्हे क्र.१८०/२अ पैकी दक्षिणेकडील १ हे २३ आर मालकीहक्क कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करतात. त्यामुळे वादीचे वाद मिळकतीतील कायदेशिर मालकीहक्कास इजा पोहचुन अपरिमीत नुकसान होत आहे. त्यामुळे दिनांक ०३.०८.२०१४ रोजी प्रतिवादींनी वादीस हरकत अडथळा केला ही वस्तुस्थिती दाव्यामध्ये दुरुस्ती करुन मांडणे आवश्यक असल्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जास प्रतिवादींनी निशाणी २२ कडे म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, सदरच्या अर्जाद्वारे निरंतर मनाई हुकुमाची मागणी केलेली आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होत असून तशी दुरुस्ती वादीस करता येणार नाही. त्याकरिता वादींनी स्वतंत्र दावा दाखल करणे आवश्यक आहे. सबब अर्ज नामंजुर करण्याची प्रतिवादींनी मागणी केली आहे.

४. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

५. दाव्यामध्ये वादींनी, वाद मिळकतीमध्ये ते खरेदीखताने कब्जेवहिवाटीत असल्याचे नमुद केले आहे. तसेच प्रतिवादी वादींना त्यांच्या वहिवाटीस हरकत अडथळा करत असल्याने हद्दीखुणा निश्चित होण्याकरिता मोजणी करुन घेण्याची वादींना आवश्यकता भासली व त्यांनी प्रतिवादींकडे मोजणीकरिता संमती मागितली असता प्रतिवादींनी नकर दिला, असे कथन केले आहे. यावरुन वादींनी वाद मिळकतीतील त्यांच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादी हरकत अडथळा करतात याबाबतचे कथन केल्याचे स्पष्ट होते. प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना दिनांक ०३.०८.२०१४ रोजी प्रतिवादींनी वादींच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा केला, असे या अर्जात वादींनी नमुद केले आहे. दावा दाखल करतेवेळी देखिल प्रतिवादी हरकत अडथळा करत असल्याचे दाव्यात नमुद आहे हे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे वादी हरकत अडथळयाबाबतचे नविन कथन करुन ते दाव्यामध्ये आणु इच्छित आहे असे वाटत नाही. याउपर दावा प्रलंबित असताना वाद मिळकतीबाबत हरकत अडथळा झाल्याचे वादींचे कथन असल्यामुळे सदरची बाब या दाव्यात समाविष्ट करुन घेणे आवश्यक आहे. कथित कारणाकरिता वादींनी दुसरा दावा दाखल केल्यास विनाकारण जास्तीचे प्रकरण दाखल करण्यासारखे होईल. सदरची बाब या दाव्यात विचारात

घेतली जावु शकते.

६. प्रस्तुत दाव्यात अदयापि मुददे निश्चित झालेले नाहीत. त्यामुळे प्रतिवादींना सदर दुरुस्तीबाबत त्यांचा बचाव मांडण्याची संपुर्ण संधी उपलब्ध आहे. वाद मिळकतीच्या कब्जेवहिवाटीत असल्याचे वादींचे दाव्यात सुरुवातीपासुनचे कथन आहे. वादींनी सर्व्हे क्र.१८० मधील क्षेत्र खरेदी घेतल्याचे प्रतिवादींनी नाकारलेले नाही. वादींनी निरंतर मनाई हुकुमाची मागणी केल्यामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही. वादी कथन करतात त्या सर्व बाबी सिध्द करण्याची संपुर्ण जबाबदारी दाव्याचे अंतिम सुनावणीच्या वेळी वादींवर राहणार आहे. सदरचा अर्ज मंजुर झाल्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच प्रतिवादींना आवश्यकता असल्यास ते याबाबतचे त्यांचे म्हणणे सादर करु शकतात. त्यामुळे कथित दुरुस्ती न्यायोचीत आहे. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, मी पुढील आदेश पारीत करित आहे.

**: <u>आदेश</u> :**

१. अर्ज (नि.१९) रक्कम रु.५००/- इतक्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी दाव्यामधील कथित दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करण्याची आहे व त्याच दिवशी दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करण्याची आहे.

दिनांकः- १३.१०.२०१५
कर्जत.

सही/-
( आरती कुलकर्णी )
सहदिवाणी न्यायाधिश, क.स्तर, कर्जत.

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Devidas L. Amrute |
| Name of the Court | : | Aarti Kulkarni, Jt.C.J.J.D, Karjat. Dist- Ahmednagar. |
| Date of order | : | 13-10-2015 |
| Order signed by the P.O. | : | 13-10-2015 |
| Order uploaded on | : | 13-10-2015 |

-----------------------------------------------------